# ‘मलनिस्सारण’ ची शासनाकडून शहानिशा



## डॉ. देवधर स्कूलमध्ये शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम

**नाशिक :** पुणे विद्यार्थी गृहाच्या डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूलमध्ये रौप्यमहोत्सवी शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख पाहुण्या व प्रसिद्ध वक्त्या शिक्षणतज्ज्ञ डॉ. कुमुदिनी बांगेरा यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने शिक्षकांना आधुनिक अध्यापनाच्या विविध नवकल्पनांशी परिचित करून दिले. शिक्षकांना सक्षम करणे तसेच आधुनिक शिक्षणासाठी प्रभावी अध्यापन तंत्रे विकसित करणे हे या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट आहे. आजच्या बदलत्या शैक्षणिक संदर्भात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे अधोरेखित केले. संवादात्मक सत्रादरम्यान डॉ. बांगेरा यांनी खेळण्याच्या पद्धतीने शिकवण्याचे प्रभावी तंत्र वापरून शिक्षण उद्दिष्टे प्रभावीपणे समजावली. ज्यामुळे सत्र आकर्षक व संस्मरणीय ठरले.

◆ **नाशिक (प्रतिनिधी):**

गोदावरी प्रदूषणमुक्तीसाठी सुरुवातीपासूनच चर्चेत असलेल्या सुमारे १,६३६ कोटींच्या मलनिस्सारण योजनेच्या प्रस्तावाची राज्य शासनाकडून शहानिशा सुरू झाला आहे.

महापालिकेने या योजनेसंदर्भात ५० पानांचा अहवाल शासनाच्या नगरविकास विभागाला सादर केल्यानंतर योजनेचा प्रस्ताव तपासणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदी प्रदूषणमुक्तीसाठी महापालिकेने १,३७४ कोटींचा प्रस्ताव केंद्रीय




जलशक्ती मंत्रालयाकडे पाठवला होता. यामध्ये नऊ मलनिस्सारण केंद्रांचे अद्ययावतीकरण आणि मखमलाबाद व कामटवाडे या दोन नवीन केंद्रांची उभारणी प्रस्तावित आहे. दरम्यान, शासनाकडून प्रतिसाद मिळण्याअगोदरच महापालिकेने या योजनेसाठी पीपीपी तत्त्वावर निविदा प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला. त्यात विशिष्ट ठेकेदार पात्र ठरावा यासाठी अटी व शर्ती अंतर्भूत करण्यात आल्या.

### प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे

योजनेच्या कामात वाढ करून १,६३६ कोटींवर नेण्यात आली.

याविरोधात काही मक्तेदार कंपन्यांनी आक्षेप घेतल्यानंतर या निविदा प्रक्रियेतील अनागोंदी उघडकीस आली.त्यामुळे शिवसेना शिंदे गटाचे महानगरप्रमुख प्रवीण तिदमे यांनी या योजनेविरोधात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार करत योजनेला स्थगिती देण्याची मागणी केली होती. तर शिंदे गटाचे आमदार सुहास कांदे यांनीही या निविदा प्रक्रियेवर आक्षेप घेत, न्यायालयात जाण्याचा इशारा दिला होता.

त्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी तक्रारीची दखल घेऊन निविदा प्रक्रियेची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना दिले होते.

कार्यासन अधिकारी मो. क. बागवान यांनी यासंदर्भात आयुक्त मनीषा खत्री यांना वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार महापालिकेच्या पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण विभागाने ५० पानांचा अहवाल नगरविकास विभागाला सादर केला. या अहवालातील नकारात्मक शेरे योजना गुंडाळण्यास कारणीभूत ठरण्याची शक्यता असतानाच योजनेचा प्रस्ताव तपासणीसाठी शासनाने परस्पर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे पाठविल्याचे समजते.

> मलनिस्सारण योजनेचा प्रस्ताव महापालिकेने शासनाला सादर केला आहे. शासनाकडून अद्याप महापालिकेला कुठल्याही सूचना व निर्देश प्राप्त झालेले नाहीत. शासन आदेशानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.
> **- रवींद्र धारणकर,** अधीक्षक अभियंता, पाणीपुरवठा व मलनिस्सारण

# केंद्रीय संस्कृत विद्यापीठातर्फे आजपासून उत्कर्ष महोत्सव

◆ **नाशिक (प्रतिनिधी):**

केन्द्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली, लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली आणि राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, तिरुपती यांच्या संयुक्त विद्यमाने ८, ९ आणि १० जून रोजी नाशिक मध्ये आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संस्कृत विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ मदनमोहन झा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रा. निलाभ तिवारी, ब्रह्मदत्त शर्मा, मुकुंद खोचे, स्वागत समितीचे लक्ष्मण सावजी, विश्वास देवकर आदी उपस्थित होते. केन्द्रीय संस्कृत विद्यापीठ संस्कृत भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी कार्य करणारी भारत सरकारची सर्वात मोठी संस्था आहे. त्यांच्या माध्यमातून भारतभर १२ कॅम्पस, शेकडो महाविद्यालये आणि हजारो गुरुकुल पाठशाळा कार्यरत आहेत. नाशिक कॅम्पस मध्ये आयुर्वेद शिक्षणासाठी प्राथमिक ते उच्चस्तरापर्यंत गुरुकुलाची स्थापना केली जाईल. यासोबतच शास्त्र विषयांसोबत विविध व्यावसायिक प्रशिक्षण, पीजी डिप्लोमा कोर्सेस, नवीन अभ्यासक्रम व बी.ए. सिव्हिल सर्व्हिसेससाठी संस्कृत माध्यमातून मार्गदर्शन दिले जाईल.



### महोत्सवाचे कार्यक्रम

८ जून २०२५ (शनिवार) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे सकाळी १० वाजता "आगामी १० वर्षांची संस्कृत संवर्धन योजना" यावर देशभरातील संस्कृत विद्यापीठांचे कुलगुरु ,प्रतिनिधी चिंतन करतील.

९ जून २०२५ (रविवार) स्थळः गुरुदक्षिणा सभागृह, कॉलेज रोड, नाशिक वेळः सकाळी १० वाजता – सार्वजनिक उद्घाटन दुपारी २.३० वाजता "संत संमेलन".

१० जून २०२५ (सोमवार) स्थळः गुरुदक्षिणा सभागृह वेळः सकाळी १० वाजता – कुलगुरू पुरस्कार वितरण व पुस्तक लोकार्पण समारंभ

### देशात साडेतीन लाख गुरुकुल करणार

भारतीय संस्कृतीत गुरुकुल पद्धत अवलंबली जात होती. त्या काळात १ लाख ४० हजार गुरुकुले होती. परंतु पुढील काळात ही पद्धत संपुष्टात आली आहे. भारतीय संस्कृतीचा विचार पुढे नेण्यासाठी आता पुन्हा एकदा केंद्रशासन गुरुकुल पद्धतीचा स्वीकार करण्यासाठी सर्वतोपरी कार्य करत आहे. आगामी काळात देशभरात साडेतीन लाख गुरुकुल सुरू करणार असल्याचा असल्याची माहिती तिवारी यांनी दिली.

# दुग्धाभिषेक करत मोतीचूर लाडू वाटप

◆ **नाशिक (प्रतिनिधी):**

छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५१ वा राज्याभिषेक दिन सोहळा संभाजी ब्रिगेड नाशिकच्या वतीने सीबीएस येथील छत्रपती शिवाजी महाराज गार्डन येथे उत्साहात साजरा करण्यात आला. दुग्धभिषेक करून मोतीचूर लाडू व पेढ्यांचे वाटप करण्यात आले.

दुर्गदुर्गेश्वर रायगड येथे सर्व शिवप्रेमींना सामावून घेऊन जागतिक सोहळा मोठ्या दिमाखात साजरा होतो. त्याच धर्तीवर दरवर्षी प्रमाणे यंदाही संभाजी ब्रिगेड नाशिकच्या वतीने सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. मराठा सेवा संघाचे प्रमोद अहिरराव, संभाजी ब्रिगेडचे मार्गदर्शक हिरामण वाघ, किरण मोहिते, शेतकरी चळवळीतील नेते सोपान कडलक, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाप्रमुख प्रफुल्ल वाघ, उपजिल्हाप्रमुख विकी गायधनी, संघटक नितीन काळे, प्रसिद्धीप्रमुख प्रेम भालेराव, राकेश जगताप, लकी बाविस्कर, अक्षय आठवले, अंकुश राऊत, संकेत तलाठी,महेंद्र बेहेरे,अमोल जाधव,वैभव पवार, गणेश पाटील, संतोष बोके, माधव कराटे, युवराज गांगुर्डे,.संदीप पाटील, मुकुंद सुर्वे, प्रमोद अहिरराव,जितू आहेर, प्रतीक बेलेकर प्रशांत पाटील, नितीन खैरनार ,रोहित पारख आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मालेगाव स्टॅण्ड मित्र मंडळाच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन सोहळा



शिवराज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपतींना अभिषेक करताना संत साहित्याचे अभ्यासक डॉ. तुळशीराम महाराज गुट्टे, बीएपीएस स्वामी नारायण मंदिराचे यज्ञस्वरूप स्वामी, दिव्य नयन, स्वामी, खासदार राजाभाऊ वाजे ,भाजप शहराध्यक्ष सुनील केदार ,विनायक पांडे, आयोजक मामा राजवाडे, पंचवटी पोलीस निरीक्षक मधुकर कड, भगवंत पाठक, उत्तम उगले आदी.


◆ **पंचवटी (प्रतिनिधी):**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त पंचवटी परिसरातील मालेगाव स्टॅण्ड मित्र मंडळाच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. तसेच, महाराजांच्या धातूच्या मूर्तीस प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी महाआरती करून शिव राज्याभिषेक दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ढोल पथकांनी सलामी दिली तर फटाक्यांची मोठी आतिषबाजी करण्यात आली.

खासदार राजाभाऊ वाजे,माजी आमदार बाळासाहेब सानप,संत साहित्य अभ्यासक डॉ तुळशीराम महाराज गुट्टे , बी ए पी एस स्वामीनारायण प.पु यज्ञस्वरूप स्वामी, प.पु. दिव्यनयन दास स्वामी, शिवसेना उपजिल्हाध्यक्ष मामा राजवाडे,माजी महापौर विनायक पांडे, माजी नगरसेवक शाहू खैरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रंजन ठाकरे यांच्या हस्ते दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर पाण्याने अभिषेक करून महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून महाराजांची महाआरती करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज कि जयच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. या शिवराज्याभिषेक दिनासाठी पंचवटी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मधुकर कड,भाजप शहराध्यक्ष सुनील केदार,पुरोहित संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षारी,पंचवटी शिवजन्मोत्सव समितीचे कार्याध्यक्ष हर्षल पवार, सरचिटणीस निखिल गायकवाड, श्रीपाद सूर्यवंशी ,शाहू पवार, माजी नगरसेवक उल्हास धनवटे,कमलेश बोडके, उत्तमराव उगले,राहुल कुलकर्णी योगेश कापसे, गुलाब भोये,, राहुल दराडे, भगवंत पाठक,संदीप जाधव, मनीष बागुल,शिवसेना महिलां पदाधिकारी कीर्ती निरगुडे, स्वाती पाटील, श्रद्धा दुसाने, रंजना थोरवे, कस्तुरी आठवणे, यासह आप्पा शिंदे,संदेश फुले ,शंतनु शिंदे, रवी आवारकर ,तसेच मालेगाव स्टॅन्ड मित्र मंडळाचे अध्यक्ष विशाल देशमुख, बाबासाहेब बढे, प्रवीण कुमावत, योगेश परदेशी, तन्मय येवले, संदीप सिनकर, विजय पगारे, ओम जोशी, अमित खांदवे, बाजी शिंदे, योगेश पवार, आदींसह मंडळाचे पदाधिकारी आणि शिवप्रेमी उपस्थित होते.

### महाराजांच्या धातूच्या मूर्तीस प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दुग्धाभिषेक

# महाशब्दकोडे क्र. ४१



**आडवे शब्द**

१) महावीर हनुमानाचा पाठ याचे वाचन केले जाते.
५) १५ ऑगस्ट हा दिवस साजरा केला जातो.
९) सैन्याचा प्रमुख
११) देवघरात जाळतात तो अगरबत्ती सारखा प्रकार
१३) माह, मास
१६) जुने पेपर, कागदे
१९) पद्धत, परंपरा
२१) गोडी, रस असणे
२२) दिवाळीच्या वेळी बनवता तो गोड पदार्थ
२३) कापडावर धाग्यांनी कलाकुसर केलेले काम
२६) प्रत्येकजण
२८) विदुषक (इंग्लीश), सर्कसीतील मनोरंजन करणारे
३०) धान्याचा एक प्रकार
३१) फुलांची माळ, पराभव
३२) शेत (हिंदी)
३३) प्रेत (हिंदी)
३४) पक्ष्यांचा समुह
३६) इंग्रजी एक आद्याक्षर
३७) किनारा
३९) हिंदु धर्मातील पवित्र स्थळ
४०) भितींवरील किटक खाणारी
४१) भाजीसाठी हे लागतेच xx, पदार्थापासून बनविलेला पातळ पदार्थ
४३) शेतीचा एक हंगाम
४६) भाजीचा सार
४८) लाकडांचे मोठे भांडार
४९) खोटा नाही तो
५०) प्रभु रामाची १४ वर्षे
५२) सापाचे जमिनीतील घर
५३) सातारा जिल्ह्यातील प्रमुख तालुका
५४) पाळत ठेवणे
५५) हळुवार, संथगतीने
५७) पगार
५९) एक संख्या
६०) नोकरानी, सेविका
६१) त्रासलेला
६३) आता पदावर नसलेला
६४) विष
६५) पावर्ती देवीचे नाव
६९) कोंब, अंकुर
७१) आवड, गोडी
७६) जादुटोना
७९) ठिकाण
८१) १ मे रोजी हा दिवस साजरा होतो
८३) लाकुडकाम करणारा कारागीर
८४) शिक्षा (हिंदी)
८५) ‘उजवा’च्या विरुद्ध
९०) पाठिंबा, आश्रय
९२) ठिपका, कलंक
९४) मोठा मानसिक धक्का (हिंदी)
९६) समानता, बरोबरी
९८) बुड
९९) नवी दिल्लीतील येथे ध्वजारोहण समारंभ होतो
१००) उत्तराधिकारी मिळालेले
१०२) विष्णुचा एक अवतार
१०३) शरीरातील प्रमुख द्रव्य घटक
१०५) जाळल्यानंतर मिळते ती xx
१०७) xx कपुर, हिंदी अभिनेता
१०९) मीठ
१११) नाराज असणे
११३) स्वराज्यासाठी लढणारा निधड्या छातीचा सैनिक
११४) एक संख्या
११६) पांढरा, शुभ्र
११७) दैवी देणगी, मेहरबानी
१२०) भाकर करण्याचे पात्र
१२१) दोन्ही हात जोडुन झालेली पोकळी
१२३) गोष्ट
१२४) मतभेद
१२६) मतितार्थ, सारांश
१२८) फौजी
१३०) दहावी रास
१३२) क्रांतीज्योत, दिवटी
१३४) भाता सोबत लागतेच xxx
१३६) महिला, स्त्री
१३७) समईत कापसाची xx लावतात
१३८) ताण, वृक्षा अभिमान
१३९) तूप (हिंदी)
१४०) एक पवित्र मराठी महिना
१४१) तांदळापासुन बनविलेला पदार्थ

**उभे शब्द :**

१) प्रश्नांना तात्काळ उत्तर देणारा
२) खवा, दुध आटवून तयार करतात
३) एका रांगेतील घरे
४) गोसावी, वैराग्य प्राप्त केलेला
६) तांत्रिक ज्ञान, उपयोगी विज्ञान
७) दिवाळीचा सण
८) समान
९) सैन्य
१०) विनोबा भावे यांनी उभारलेला (भुदान आंदोलन) आश्रम
१२) दंतकथेतील सुंदर तुरीणी
१४) रत्नाचे नाव, साठवी जयंती साजरी करतात तो महोत्सव
१५) सागरी सैन्य
१७) निवास, सदन
१८) बांगलादेशाची राजधानी
२०) युद्धा नंतरच्या वाटाघाटी
२३) वांग्यापासुन बनवलेली रेसीपी
२४) बारा वर्षाचा कालावधी
२५) भगवान शंकराचा हा उत्सव साजरा केला जातो.
२७) ठेवलेली स्त्री, उपपत्नी
२८) उत्साह (हिंदी)
२९) राजा महाराजांचे वाहन
३२) खेळ (हिंदी)
३३) एक रंग
३५) उत्तराधिकारी
३८) फजिती
४०) शिकार करणारा
४१) मृत्युनंतर केली जाणारी एक विधी
४२) मोबदला न घेता दिलेले सत्कर्म
४४) विहीरीतील तळाला असलेली घाणमाती
४५) घरगुती वापरायच्या सर्व किरकोळ वस्तु
४७) सापा संबंधी खेळला जाणारा पटावरील एक खेळ
५०) जंगल, रान
५१) नुकसान, पतन, ऱ्हास
५२) प्रसिद्ध राज्याचे नाव
५६) आईचा भाऊ
५८) भेग
६२) एकावर एक रचलेले
६६) मामाची पत्नी
६७) जाहीर बैठ, श्रोत्यांचा समुदाय
६८) तिर्थक्षेत्र
७०) हक्काची सुटी
७२) समान
७३) राष्ट्रविषयीचा अभिमान बाळगणारी विचारसरणी
७४) ज्याची शिकार केली जाते ते
७५) आखातातील एक देश, अरबी एक छोटासा देश
७७) नाममात्र
७८) एक संख्या
८०) मोठी गाडी
८२) लालच, हेवा
८६) मोठा बंगला, गावातील मोठे घर
८७) मतभेद
८८) श्रम केल्याने येणारे स्त्राव, कष्टाने काम केले की हा येतो
८९) देहु जवळचे तिर्थक्षेत्र
९१) मुस्लिम धर्मातील भिक्षुक
९३) ‘वाग’ उलट करा
९४) भित्रा प्राणी
९५) आईची बहीण
९६) पिकनिक, छोटी टूर
९७) कर्जासाठी ठेवलेली वस्तु किंवा रकम
९९) लक्ष, रकम
१०१) ताठा, गुर्मी
१०४) सलीमची प्रेयसी
१०५) माजी पंतप्रधानाचे फक्त नाव
१०६) काक, काळा पक्षी
१०७) एक आडनाव
१०९) गाडयावर मिळणारा पदार्थ
११०) औषधी शेंगाची भाजी
११२) सदैव, नेहमी
११४) औषध (हिंदी)
११५) पायातील महिलांची साखळी
११८) रक्षण करणारा
११९) नवीन
१२०) ‘जर’च्या विरुद्ध
१२२) प्रवास करणारा
१२५) ताकद, बळ
१२६) वर्ष, सन
१२७) स्वाभिमान, अभिमान
१२९) पर्वत, डोंगर
१३०) विचार
१३१) ताठा, गर्व
१३३) सायंकाळ (हिंदी)
१३५) किंमत, दर
१३६) मुला मुलींची मुलगी

**महाशब्दकोडे क्र. ४१ चे उत्तर बुधवार दि. ११ जून च्या अंकात**

## शब्दकोडेकार - प्रा. गिरीश पाटील

### शब्द कोडे ४० चे उत्तर

